मंत्रिमंडळ प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात
अवलंबविण्याची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्र.मुसका-२०१७/ई-२६४५५६७/का.१,
मुख्य सचिव कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१७.

वाचा : शासन परिपत्रक, सा.प्र.विभाग/मुख्य सचिव कार्यालय, क्र.मुसका-२०१४/ई-११०१५/२/का.१, दिनांक १ एप्रिल, २०१४.

शासन परिपत्रक

संदर्भाधिन दिनांक १ एप्रिल, २०१४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन सर्व विभागांना मंत्रिमंडळ प्रस्ताव सत्वर सादर करण्यासंदर्भात अंमलबविण्याची कार्यपध्दतीच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. परंतु, असे दिसून आले आहे की, मंत्रालयीन विभागांकडून सदर सूचनांचे पालन केले जात नाही आणि शासन परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाहीही केली जात नाही.

२. त्याअनुषंगाने मंत्रिमंडळाचे प्रस्ताव सादर करताना सर्व मंत्रालयीन विभागांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याचे निदेश देण्यात येत आहेत.

१) मंत्रिमंडळ प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीपुढे सादर करण्यासंदर्भात शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर मंत्रिमंडळ टिप्पणीच्या ५० प्रती मुख्य सचिव कार्यालयाला त्याच दिवशी वा दुस-या दिवशी प्राप्त होणे आवश्यक आहे.

२) मंत्रिमंडळ टिप्पणीच्या प्रती सादर करतांना खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी. :-

(अ) प्रस्तावित विषयाबाबतची **संक्षिप्त टिप्पणी** (In Bullet Form) सादर करण्यात यावी. त्या टिप्पणीमध्ये प्रस्तावित विषया संदर्भातील थोडक्यात प्रस्तावाना, प्रस्तावाचे स्वरुप, प्रस्तावाची आवश्यकता, पडणारा आर्थिक भार व त्यामुळे होणारा लाभ इत्यादी बाबींचा समावेश असावा.

(ब) प्रस्तावित विषयास मंत्रिमंडळाची मान्यता मिळेल त्या अनुषंगाने निर्गमित करावयाच्या **शासन निर्णयाचे प्रारुप** मंत्रिमंडळ टिप्पणीसोबत सादर करणे आवश्यक आहे.

(क) प्रस्तावित विषय मंत्रिमंडळामध्ये मान्य होईल त्याअनुषंगाने **प्रसिध्दी पत्रकाचे** (Press Note) प्रारुपही मंत्रिमंडळ टिप्पणीसोबत सादर करण्यात यावे. मंत्रिमंडळ बैठक संपन्न झाल्यानंतर तात्काळ प्रसिध्दी पत्रकाची प्रत श्री.हेमराज बागूल, मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी यांना देण्यात यावी. तसेच निर्णयाचे इतिवृत्त त्याच दिवशी मुख्य सचिव कार्यालयास उपलब्ध करुन द्यावे.

३. तातडीच्या प्रसंगी विषय मंत्रिमंडळापुढे सादर करावयाचा झाल्यास वरीलप्रमाणे संक्षिप्त टिप्पणी व प्रारुप प्रसिध्दी पत्रक यासह संबंधित विभागाच्या सचिवांनी स्वत: प्रस्तावासंदर्भात मुख्य सचिव कार्यालयास व मुख्यमंत्री सचिवालयास पुरेशी माहिती करुन द्यावी.

४. वरील निदेशाचे कटाक्षाने पालन करण्याची जबाबदारी मंत्रालयीन विभागांच्या सचिवांची असेल. त्यामुळे कृपया त्यांनी वरील निदेशाचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१०२५१३०२०६१९०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sumit Mullick
Date: 2017.10.26 10:38:36
+05'30'

(सुमीत मल्लिक)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव / सचिव
३. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी
७. निवड नस्ती (का.१)